


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १९, गुरुवार ५ डिसेंबर २०२४ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# मुंबईकडे नव्हे, लालपरीचे थेट प्रतिक्षालयात प्रस्थान!

**पारनेरच्या बसस्थानकावरील थरार | अनेक प्रवासी बालंबाल बचावले | सुदैवाने जिवित हानी नाही | एक प्रवासी जखमी**

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेरहून मुंबईकडे जाणारी पारनेर-मुंबई ही पारनेर आगाराची बस क्र. एमएच १४ बीटी ४२८० फलाटावर उभी राहण्याऐवजी थेट बसस्थानकावरील प्रतिक्षालयात घुसल्याचा थरार तिथे उपस्थित प्रवाशांनी अनुभवला. फलाट ओलांडून बस प्रतिक्षालयाकडे येत असल्याचे पाहून तेथील प्रवाशांनी पळ काढल्याने सुदैवाने जिवित हानी झाली नाही. एका प्रवाशाच्या पायाला किरकोळ जखम झाली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे पारनेर बसस्थानकावर एकच गोंधळ उडाला. मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी सायंकाळी पावणेआठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.**

शंकर बबन ठाणगे (वय ५५ रा. करंदी) असे या अपघातात जखमी झालेल्या प्रवाशाचे नाव आहे. त्यांना वाहतूक नियंत्रक जितेंद्र शेळके यांनी तातडीने उपचारासाठी पारनेरच्या ग्रामीण रूग्णालयात भरती केले. तेथील प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नगरच्या शासकीय रूग्णालयात हालविण्यात आले आहे. बसचे ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे.

या घटनेसंदर्भातील माहिती अशी की पारनेर बसस्थानकावरून दररोज सायंकाळी साडेसात वाजता सुटणारी बस चालक नामदेव बाबूराव ढाकणे हे कार्यशाळेतून बसस्थानकाकडे घेऊन आले. बस फलाटावर लागेल या आशेने फलाट क्र.२ मागील प्रतिक्षालयातील प्रवासी बसमध्ये बसण्याची लगबग करू लागत होते, त्याच वेळी फलाट ओलांडून ही बस थेट प्रतिक्षालयात घुसली. ते पाहून प्रवसी सैर-भैर झाले. जिव वाचविण्यासाठी त्यांनी इतर फलाटांकडे धाव घेतली त्यामुळे सुदैवाने जिवित हानी झाली नाही. हीच घटना दुपारी, संध्याकाळी शाळा-महाविद्यालय सुटणच्या, गर्दीच्या वेळेत झाली असती तर मोठा अनर्थ घडला असता, कदाचित अनेकांना प्राणास मुकावे लागले असते.अशी चर्चा या घटनेनंतर बसस्थानकावर सुरू होती.



■ पारनेरहून मुंबईकडे जाणारी बस फलाटावर उभी न राहता थेट प्रतिक्षालयात घुसल्याने तिथे उपस्थित प्रवशांनी अंगावर शहारे आणणारा थरार अनुभवला.

## दहा वर्षांपूर्वीच्या घटनेला उजाळा

१९८६ साली, ३८ वर्षांपूर्वी पारनेर बसस्थानकाचे बांधकाम पुर्ण झाले त्यावेळी प्रतिक्षालयाच्या सुरक्षेसाठी, फलाटांच्या समोर भक्कम लोखंडी बॅरिकेडस बसविण्यात आले होते. मात्र १५ वर्षांपूर्वी बसस्थानकाचे नुतनीकरण करण्यात आले त्यावेळी वाहतूक नियंत्रक कक्षासमोरील बॅरिकेडस वगळता इतर फलाटांसमोरील बॅरिकेडस काढून टाकण्यात आले. ही बॅरिकेडस पुन्हा बसविण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. दहा वर्षापूव एक खाजगी वाहन फलाट क्रमांक एक वरून थेट प्रतिक्षालयात घुसले होते. त्यावेळी बुक स्टॉलचे मोठे नुकसान झाले होते. या घटनेच्या आठवणी या अपघाताने पुन्हा ताज्या झाल्या.

## गलथान कारभार अपघातांना निमंत्रण देणारा

पारनेर आगारात सुमारे ४५ बसेस आहेत. त्यातील बहुतेक कालबाह्य झालेल्या आहेत. सर्वच बसचे प्रेशर पाईप गळत असल्याने हवेचा दाब कमी होऊन ब्रेक निकामी होण्याच्या किंवा ब्रेक काम न करण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. प्रेशर पाईपची गळती दुर करण्याचे किरकोळ दुरूस्तीचे काम कार्यशाळेत होत नसल्याच्या तक्रारी चालक नेहमीच करतात. त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चालक वाहकांचे म्हणणे आहे. आगार व्यवस्थापक, कार्यशाळा अधीक्षक, कार्यशाळेतील कर्मचारी यांचा गलथान कारभार मोठया अपघातांना आमंत्रण देणारा आहे.

## उतारामुळे अपघात ?

बसस्थानकासमोरच पारनेर आगाराची कार्यशाळा आहे. या कार्यशाळेतून बसस्थानकाकडे बस येते त्या ठिकाणी उतार आहे. त्यामुळे कार्यशाळेतून बसस्थानकाकडे बस वेगाने येतात. त्यातूनच हा अपघात घडला असावा अशी शक्यताही वर्तविली जात आहे.

## अपघाती बस

सात ते आठ वर्षांपूर्वी ही बस चाळीसगांव आगाराकडून पारनेर आगाराकडे पाठविण्यात आलेली आहे. यापूर्वी या बसच्या आळेफाटा आणि ओतूर येथे झालेल्या वेगवेगळ्या अपघातात सहा प्रवाशांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. त्यामुळे अपघाती बस म्हणून या बसची ओळख आहे. ही बस आपल्या आगाराकडे नको अशी मागणी कर्मचारी वेळोवेळी करत आहेत, मात्र त्याकडेही दुर्लक्ष होत असल्याचे एका कर्मचाऱ्याने नाव प्रसिध्द न करण्याच्या अटीवर सांगितले.

# देवेंद्र फडणवीस 'पुन्हा' येणार!

- राज्यातील सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा
- विधीमंडळाच्या नेतेपदी फडणवीसांची निवड
- राज्यपालांकडे सत्ता स्थापनेचा दावा
- गुरुवारी आझाद मैदानावर ग्रँड शपथविधी




मुंबई : प्रतिनिधी

**राज्यातील सत्तास्थापनेचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. उद्या ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्याची शपथविधी पार पडणार आहे. त्यापूर्वी आज भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांची विधीमंडळाचा नेता म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. आता ५ डिसेंबर रोजी फडणवीस यांचा आझाद मैदानावर ग्रँड शपथविधी सोहळा होणार आहे. मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीनंतर राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून फडणवीस राज्याचा कारभार सांभाळतील.दरम्यान महायुतीतील अनेक प्रमुख नेत्यांनी राजभवनावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेवून सत्ता स्थापनेचा दावा केला आहे.राज्यपालांनीही सत्तास्थापनेसाठी निमंत्रण दिले आहे.**

यापूर्वी भाजपच्या विधीमंडळाच्या गटनेतेपदी निवड झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी पहिल्यांदा भाषण केले. यावेळी देवेंद्र फडणवीसांनी खरं म्हणजे राज्यातील जनतेला मी साष्टांग दंडवत घालतो, असा कौल दिला आहे, उर्वरीत पान ३ वर

# नगर-पुणे इंटरसिटी लाईनचे काम सुरू करा

**खा. नीलेश लंके यांची संसदेत मागणी | संभाजीनगर-पुणे, कल्याण रेल्वेमार्गाचीही मागणी**

नगर : प्रतिनिधी

**नगर-पुणे इंटरसिटी रेल्वेमार्गाच्या लाईनचे काम केवळ मेंन्टनन्स पॉईट उपलब्ध नसल्याने अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे.हे काम लवकरात लवकर सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी बुधवारी संसदेत केली.**

सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, छत्रपती संभाजीनगर ते नगर व नगर ते पुणे रेल्वेमार्ग अनेक महत्वाच्या शहरांशी सबंधित आहे. या मार्गावर श्री क्षेत्र देवगड, श्री क्षेत्र शनि शिंगणापुर, श्री क्षेत्र शिड आणि गणपती रांजणगांव ही महत्वपुर्ण धार्मिक स्थळे आहेत. या धामक स्थळांना भेटी देण्यासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठया प्रमाणावर आहे.या मार्गावर वाळुंज, सुपा, गणपती रांजणगांव, पुणे हे औद्योगिक क्षेत्र आहेत. तिथे काम करणारे अनेक मजुर, कामगार, व्यापारी यांनाही प्रवास करावा लागतो. हा रेल्वे मार्ग झाल्यास अनेक प्रवाशांचा प्रवास सुलभ होईल तसेच औद्योगिक क्षेत्रातील उत्पादित मालाच्या वाहतुकीसाठीही सुविधा उपलब्ध होईल. या मार्गावर पुणे, संभाजीनगर व शिड ही विमानतळे असल्याने हा मार्ग महत्वपुर्ण आहे. तसेच नगर-कल्याण रेल्वेमार्गाचे काम सुरू होणेही महत्वाचे आहे. बीड, नगरचे लोक पुणे, मुंबई, कल्याणशी निगडीत आहेत. त्यासाठी हा मार्ग सुरू करून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी खा. लंके यांनी केली.




## ज्येष्ठ नागरिकांना प्रवास शुल्कात सवलत द्या

अनेक वर्षे रेल्वे प्रवासात ज्येष्ठ नागरिकांना प्रवास शुल्कात सवलत देण्यात येत होती. कोरोना काळात ही सवलत बंद करण्यात आलेली आहे. साठ वर्षे पुरूषांसाठी तर ५८ वर्षावरील महिलांसाठी ४० ते ५० टक्के सवलत देण्यात येत होती. ही सवलत लवकर सुरू करून ज्येष्ठ नागरीकांना दिलासा देण्यात यावा.

खा. नीलेश लंके

## निंबळकला उड्डाणपुल हवा

माझ्या मतदारसंघातील निंबळक हे गाव नगर शहराशी निगडीत आहे. या गावाजवळील रेल्वेमार्गावर उड्डाण पुलाची आवश्यकता आहे. कारण २५ ते ३० गावांचा रोजचा संपर्क या मार्गावरून आहे. दर १५ मिनिटांनी रेल्वे क्रॉसिंगसाठी हा मार्ग बंद असतो. नागरीकांची होणारी गैरसोय दुर करण्यासाठी या उड्डाण पुलाचे काम लवकरात लवकर सुरु व्हावे.

खा. नीलेश लंके

# भूल देऊन खुराड्याबाहेर काढला बिबट्या!

**वन विभागाच्या रेस्क्यु ऑपरेशनला यश**

निघोज : संदीप इधाटे

**कोंबडया फस्त करून खुराडयात अडकलेल्या बिबटयाला वन विभागाने रेस्क्यु ऑपरेशन करत बाहेर काढण्यात आले. संगमनेरच्या रेस्क्यु ऑपरेशनच्या पथकाने निघोजमध्ये पोहचल्यानंतर भूलीचे इंजेक्शन देऊन त्याला बेशुध्द केले. त्यानंतर त्याला बाहेर काढून पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आले.**

कुंड वस्तीवरील लामखडे यांच्या शेतातील खुराडयामध्ये बिबट्या आडकल्याचे लामखडे परिवारातील सदस्यांच्या लक्षात आल्यानंतर सचिन वराळ, ज्ञानेश्वर वरखडे यांनी वन विभागाचे अधिकारी गजानन धाडे यांच्याशी संपर्क करून माहिती दिली. वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचल्यानंतर बिबट्याला बाहेर काढण्यासाठी रेस्क्यु ऑपरेशन टीमला पाचारण करण्यात आले.

संगमनेर येथील रेस्क्यु ऑपरेशन टीमचे संतोष पारधी, हनुमंत घुगे, रविंद्र पडवळे, ज्ञानेश्वर कोरडे यांनी बिबटयाचा अंदाज घेत त्याला शिताफीने भुलीचे इंजेक्शन दिले. भुल दिल्यानंतर सुमारे पाऊण तासानंतर बिबट्या बेशुध्दावस्थेत गेला.

बिबटया बेशुध्दावस्थेत गेल्याची खात्री झाल्यानंतर वन विभागाच्या संगमनेरच्या रेस्क्यु ऑपरेशन टीमच्या कर्मचाऱ्यांनी बिबटयाला खुराडयातून अलगद बाहेर काढून पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आले. बिबटया शुध्दीवर आल्यानंतर त्यास जंगलात मुक्त करण्यात आल्याचे सांगण्यात आले.



■ खुराडयात अडकलेल्या बिबटयाला रेस्क्यु ऑपरेशन टीमच्या कर्मचाऱ्यांनी भूल देऊन खुराडयाबाहेर काढले. (छाया : संदीप इधाटे)

# महावितरणचे कार्यकारी संचालक सुनील पावडे यांचे निधन

**हृदयविकाराच्या झटक्याने अकाली एक्झिट | नगर-पुणे जिल्हा हळहळला | दरोडी येथे अंत्यसंस्कार**

निघोज : रोहन उनवणे

**महावितरणचे कार्यकारी संचालक प्रकल्प सुनील रंगनाथ पावडे यांनी सोमवारी रात्री जळगांव येथे हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. ते ५३ वर्षांचे होते. त्यांच्यावर त्यांच्या मुळ गावी दरोडी, ता. पारनेर येथे बुधवारी दुपारी चार वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. पावडे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या अकाली एक्झिटमुळे नगर जिल्हयासह पुणे जिल्हा हळहळला.**

पावडे यांच्या अकाली निधनामुळे महावितरणच्या वर्तुळात शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी निशिगंधा, मुलगी मृणाल, आई, वडील, भाऊ, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.

सन १९९१ मध्ये सुनील पावडे यांनी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून सेवेला सुरूवात केली. सन २००६ मध्ये सरळ सेवा भरतीतून त्यांनरा कार्यकारी अभियंता पदावर बढती मिळाली. नोव्हेंबर २०१५ पासून त्यांनी अधीक्षक अभियंता या पदावर पुणे ग्रामीण व नाशिक शहर मंडलात काम केले. सन २०१८ मध्ये सरळ सेवेतून मुख्य अभियंतापदी बारामती परिमंडळात त्यांनी काम केले.



## गुणवंत विद्यार्थी म्हणून ओळख

सुनील पावडे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण निघोज येथे झाले. अतिशय गुणवंत विद्याथ म्हणून त्यांची ओळख होती. शिरूर व पुणे येथे त्यांनी उच्च शिक्षण घेउन ते तत्कालीन विद्युत मंडळाच्या सेवेत रूजू झाले होते.

## एक गांव एक दिवस

मुख्य अभियंता म्हणून काम करताना त्यांनी महाराष्ट्राला एक गाव एक दिवस हा उपक्रम दिला. दैनंदिन कामकाजातही त्यांनी आपली स्वतःची छाप कायम सोडली. बारामती परिमंडळ अग्रेसर कसा राहील याची काळजी घेतली. तब्बल सहा वर्षे बारामती येथे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यादरम्यान त्यांनी काही काळ प्रादेशिक संचालक पदाचा कार्यभारही सांभाळला. जुलै २०२४ मध्ये त्यांची कार्यकारी संचालक, प्रकल्पपदी निवड झाली होती. अत्यंत कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय अभियंता म्हणून त्यांची ओळख होती.

## साहेबांची मदत विसरता येणार नाही

पारनेर तालुक्यातील दरोडी गावचे सुपुत्र, महावितरणचे कार्यकारी संचालक, बारामती परिमंडळाचे मा. मुख्य अभियंता सुनील रंगनाथ पावडे यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. माझ्या मतदारसंघातील महावितरणच्या कामासंदर्भात पावडे साहेबांनी केलेली मदत कधीही विसरता येणार नाही. त्यांना मी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. पावडे कुटूंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत.

खा. नीलेश लंके

## आकस्मिक निधन धक्कादायक

महावितरणमधील अत्यंत कार्यक्षम अधिकारी म्हणून नावलौकिक असलेले सुनील पावडे यांचे आकस्मिक निधन धक्कादायक आहे. बारामतीत त्यांनी सहा वर्षे सेवा बजावताना अनेक महत्वाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग दिला. अनेक विधायक उपक्रम त्यांनी राबविले. त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

अजित पवार, उपमुख्यमंत्री

## दुःखद बातमी

महावितरणचे कार्यकारी संचालक व बारामती परिमंडळाचे मा. मुख्य अभियंता सुनील पावडे यांचे निधन झाल्याची बातमी अतिशय दुःखद आहे. या घटनेमुळे पावडे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. भावपूर्ण श्रध्दांजली.

खा. सुप्रिया सुळे

## निघोजशी स्नेहभाव

सुनील पावडे यांचे वडील रंगनाथ पावडे हे जिल्हा बँकेच्या निघोज शाखेत शाखाधिकारी म्हणून कार्यरत होते. सेवा निवृत्तीनंतरही त्यांनी निघोज येथेचा वास्तव्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पावडे परिवाराचा निघोजशी स्नेहभाव वृध्दींगत झालेला आहे.



# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

## तुमच्या फोनची बॅटरी पुन्हा पुन्हा संपते का? या सेटिंगजमध्ये त्वरित करा बदल




**स्मार्टफोन वापर प्रत्येक गोष्टीत होऊ लागला आहे. कुणाशी बोलायचे असेल किंवा कुणाला अर्जंट मेल पाठवायचा असेल, मार्ग माहीत नसेल किंवा सोशल मीडिया ब्राउझ करायचा असेल, प्रत्येक काम फोनद्वारे सहज करता येते. पण एक समस्या जी आपणा सर्वांना भेडसावत असते ती म्हणजे बॅटरीची. फोनची बॅटरी कितीही पॉवरफुल असली तरी कधी कधी ती लवकर संपते. ही समस्या खूप सामान्य आहे आणि आम्ही तुमच्यासाठी या समस्येचे निराकरण येथे आणले आहे**

### फोनची बॅटरी जास्त काळ टिकण्याचे मार्ग

- **तुमच्या फोनची स्क्रीन पटकन बंद होण्यासाठी सेट करा.**
- **फोन स्क्रीनची चमक कमी ठेवा.**
- **चमक आपोआप बदलण्यासाठी सेट करा.**
- **कीबोर्ड आवाज आणि कंपन बंद करा.**
- **भरपूर बॅटरी वापरणाऱ्या ॲप्सचा वापर कमी करा.**
- **अडॅप्टिव्ह बॅटरी चालू करा.**
- **गडद थीम सक्षम करा.**




### या सेटिंग्ज बदला

- लोकेशन बंद करा : एक मार्ग म्हणजे लोकेशन बंद करा. तुम्हाला ॲप्सच्या लोकेशन सर्व्हिसेस बंद कराव्या लागतील. लोकेशनची आवश्यकता नसलेली ॲप्स काढा. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. त्यानंतर तुम्हाला त्या ठिकाणी जावे लागेल. यानंतर तुम्हाला ॲप परमिशनमध्ये जावे लागेल. येथे तुम्हाला कोणत्या ॲप्सना लोकेशन परवानगी देण्यात आली आहे ते दिसेल.
- खूप बॅटरी वापरणाऱ्या ॲप्सना बाय-बाय म्हणा : जर तुमच्या फोनमध्ये असे कोणतेही ॲप असेल ज्याचा उपयोग होत नसेल आणि खूप जास्त बॅटरी वापरत असेल तर ते फोनमधून डिलीट करणे चांगले. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. त्यानंतर तुम्हाला बॅटरी आणि डिव्हाइस केअरवर जावे लागेल. यानंतर, तुम्हाला बॅटरीवर जावे लागेल आणि कोणते ॲप अधिक बॅटरी वापरत आहे ते पहावे लागेल. जास्त बॅटरी वापरणारे कोणतेही ॲप हटवा.

## ५ प्रकारे वापरा घरी पडून असलेला स्मार्टफोन!

**तुमच्या घरी असा जुना फोन आहे जो कोणी वापरत नाही, तर आज आम्ही तुम्हाला असे ५ उपाय सांगत आहोत जे तुम्हाला जुना फोन वापरण्यास भाग पाडतील. जेव्हा तुम्ही नवीन फोन खरेदी करता तेव्हा तुम्ही तुमच्या जुन्या फोनचे काय करता ? अनेक वेळा जुना फोन घरामध्ये निष्क्रिय राहतो तर तुम्ही त्याद्वारे अनेक गोष्टी करू शकता. तुम्ही जुने फोन ६ वेगवेगळ्या प्रकारे पुन्हा वापरात आणू शकतात.**




- कार कॅमेरा : तुमच्या जुन्या फोनचा कॅमेरा ठीक असेल तर तुम्ही तुमच्या कारमध्ये डॅश कॅमेरा म्हणून वापरू शकता. यासाठी तुम्हाला एक ॲप डाउनलोड करावे लागेल. तुम्ही प्ले स्टोअरवरून कोणतेही डॅश कॅमेरा ॲप डाउनलोड करू शकता. तुमच्या फोनवर डाउनलोड केल्यानंतर तुम्ही फोन कारच्या डॅशबोर्डवर ठेवून त्याचा वापर करू शकता. जेव्हा तुम्हाला रस्त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे लागते तेव्हा हे कामात येते.
- स्टोरेज डिव्हाइस : दुसरा मार्ग म्हणजे फोन पुन्हा वापरणे. तुम्ही जुन्या फोनला स्टोरेज डिव्हाइस बनवू शकता. तुम्ही तुमचे सर्व फोटो, व्हिडिओ आणि फाइल या फोनमध्ये सेव्ह करू शकता आणि तुमच्या नवीन फोनचे स्टोरेज फ्री ठेवू शकता.
- पुनर्वापर : तुमचा जुना फोन कार्यरत स्थितीत नसल्यास आणि कोणत्याही प्रकारे वापरला जाऊ शकत नसल्यास, तो Cashify.in, Recycledevice.com किंवा Namoewaste.com सारख्या ऑनलाइन वेबसाइटवर पुनर्वापरासाठी पाठवा. या सर्व वेबसाइट्स संपूर्ण भारतातील ई-कचरा गोळा करतात आणि नंतर तो पुनर्वापर करणाऱ्या प्लांटमध्ये नेतात. त्यांचे अनेक भाग पुनर्वापरासाठी बाहेर काढले जातात. यातून तुम्हाला काही किंमतही मिळते. तुम्हाला बक्षिसेही मिळतात.
- एक्सचेंज : नवीन फोन खरेदी करताना तुम्ही तुमचा जुना फोन एक्स्चेंज करू शकता. याच्या मदतीने तुम्हाला तुमच्या जुन्या फोनची योग्य किंमत मिळते. त्याच वेळी, तुमच्या नवीन फोनची किंमत देखील थोडी कमी होते.
- नेव्हिगेशन उपकरणे : तुम्ही तुमचा जुना फोन नेव्हिगेशन डिव्हाइस म्हणून वापरू शकता. ते तुमच्या कारच्या डॅशबोर्डवर किंवा तुमच्या बाईकच्या हँडलबारमध्ये माउंट करा आणि नेव्हिगेशन डिव्हाइस म्हणून वापरा. असे केल्याने तुम्हाला तुमचा नवीन फोन वापरावा लागणार नाही.

## आपला पाल्य किंवा पार्टनर कुणाशी बोलतेय कसे जाणून घ्याल?

**अनेकांना आपला बॉयफ्रेंड किंवा गर्लफ्रेंड कोणाशी फोनवर तासनतास बोलत असतो हे जाणून घ्यायचे असते. त्याचबरोबर काही पालकांनाही अशाच प्रकारे आपल्या मुलांवर लक्ष ठेवावे लागते. आज आम्ही अशांसाठी काही टॉप ॲप्स सुचवत आहोत, ज्याद्वारे तुम्हाला ती किंवा तो कुणाशी बोलत असतो हे झटपट कळू शकेल.**



### mSpy

हा एक फोन ट्रॅकर आहे जो आपल्याला कोणावरही किंवा विशेषतः आपल्या मुलावर लक्ष ठेवण्याची परवानगी देतो. तुम्ही कोणत्याही त्रासाशिवाय संदेश पाहू शकाल. हे ॲप बॅकग्राउंड मोडमध्ये काम करते. तुम्हाला ज्या फोनचा डेटा पाहायचा आहे त्या फोनच्या प्रत्येक ५ मिनिटांची ॲक्टिव्हिटी तुम्हाला मिळेल. या ॲपद्वारे तुम्ही कॉल-मेसेज, सोशल मीडिया, लोकेशन, इंटरनेट इत्यादी गोष्टींचा मागोवा घेऊ शकता. हे Android, iPhone आणि iPad वर चालते.

### क्लीव्हगार्ड



ही फोन मॉनिटरिंग सेवा आहे. याच्या मदतीने तुम्ही तुमच्या मुलाच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवू शकता. हे Android, iOS, Windows वर वापरता येते. याद्वारे तुम्ही जीपीएस आणि वाय-फाय लोकेशन ट्रॅक करू शकता. दूरस्थपणे स्क्रीनशॉट घेऊ शकता. फोन कॉल रेकॉर्ड करू शकतात. हे अनेक भाषांना सपोर्ट करते. तुम्ही कॉल-मेसेजेस, सोशल मीडिया, लोकेशन, इंटरनेट इत्यादीसारख्या क्रियाकलापांचा मागोवा घेण्यास सक्षम असाल.

### eyeZy

हे देखील खूप चांगले फोन मॉनिटरिंग ॲप आहे. हे विशेषतः पालकांसाठी डिझाइन केले आहे. हे ॲप अँड्रॉइड, आयफोन आणि आयपॅडला सपोर्ट करण्यास सक्षम आहे. हे आपल्याला लक्ष्यित फोनचे फोटो, व्हिडिओ आणि ॲप्स ट्रॅक करण्यास अनुमती देते. हे Android, iPhone आणि iPad शी सुसंगत आहे. याद्वारे तुम्ही तुमच्या जोडीदाराला तुम्ही मंजूर नसलेल्या कोणत्याही कार्यक्रमात जाण्यापासून रोखू शकता. आपण लक्ष्यित फोन भेट देत असलेल्या वेबसाइट्स देखील नियंत्रित करू शकता. यामध्ये तुम्ही कॉल-मेसेजेस, सोशल मीडिया, लोकेशन, इंटरनेट इत्यादी क्रियाकलाप ट्रॅक करू शकाल.

### FlexiSPY

हे संगणक, मोबाईल फोन आणि टॅब्लेटसह वापरले जाऊ शकते. हे Android आणि iOS वर कार्य करते. iPad आणि PC ला देखील सपोर्ट करते. हे प्रत्येक ऑनलाइन क्रियाकलाप ट्रॅक करण्यास अनुमती देते. हे लपविलेल्या मोडमध्ये कार्य करते. याद्वारे तुम्ही कॉल-मेसेज, सोशल मीडिया, लोकेशन, इंटरनेट इत्यादी क्रियाकलाप ट्रॅक करू शकाल.

### uMobix

हे एक मोबाइल ॲप आहे ज्याद्वारे तुम्ही iOS आणि Android वापरकर्त्यांच्या प्रत्येक क्रियाकलापाचा मागोवा घेऊ शकता. याच्या मदतीने तुम्ही फोन कॉल्स, एसएमएस, जीपीएस लोकेशन, वेब हिस्ट्री, सोशल मीडिया यांसारख्या क्रियाकलापांचा मागोवा घेऊ शकता. हे Android आणि iOS वर कार्य करते. याच्या मदतीने तुम्ही फोन कॉल्स ट्रॅक करू शकाल. आपण मजकूर संदेश निरीक्षण करण्यास सक्षम असेल. हा एक जीपीएस ट्रॅकर देखील आहे. याद्वारे तुम्ही लोकेशन, इंटरनेट, कॉल-मेसेज, सोशल मीडिया इत्यादी क्रियाकलापांचा मागोवा घेऊ शकाल.

**(टीप : ही बातमी फक्त माहिती आहे. आम्ही कोणाचाही मागोवा ठेवण्याची किंवा निरीक्षण करण्याची शिफारस करत नाही.)**

## रूम हीटर तुमची दृष्टी हिरावून घेऊ शकतो, सतर्क रहा!

**हिवाळा सुरू झाला आहे. कडाक्याची थंडी पडू लागली आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी लोकांनी जॅकेट आणि मफलर वापरण्यास सुरुवात केली असताना, घरांमध्ये हीटरचा वापर केला जात आहे. थंडीपासून वाचण्यासाठी घरातच हीटर लावून आराम मिळू शकतो. पण तुम्हाला माहित आहे का की जर तुम्ही जास्त हीटर वापरला तर तुमचे डोळेही खराब होऊ शकतात. आम्ही तुम्हाला याबद्दल सांगत आहोत.**



- घरात पारंपरिक हिटर असो की हायटेक हिटर, त्यामुळे दृष्टी नष्ट होण्याचा धोका असतो. आम्ही असा दावा करत नाही, परंतु बऱ्याच तज्ञांचे मत आहे की आपण हीटरच्या बाबतीत काही खबरदारी घेतली पाहिजे जेणेकरून आपण सुरक्षित राहू शकाल.
- डोळ्यांना गंभीर नुकसान होऊ शकते : आपल्या सर्वांना माहित आहे की डोळे निरोगी राहण्यासाठी त्यांना ओले राहणे आवश्यक आहे. कोरडे डोळे हे आजारी डोळ्यांचे कारण आहे. रूम हीटर्सबद्दल बोलायचे झाले तर त्यांचा अतिवापर केल्याने डोळ्यांतील ओलावा निघून जातो आणि डोळ्यांत कोरडेपणा येतो. जेव्हा डोळे कोरडे होऊ लागतात तेव्हा संसर्गाचा धोका वाढतो. तुम्ही चष्मा लावा की नाही, हीटरचा अतिवापर केल्याने तुमच्या डोळ्यांना इजा होऊ शकते.
- रूम हीटरपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे : ही समस्या टाळायची असेल तर हीटरचा वापर कमी करावा लागेल. थंडी वाढली आहे असे वाटल्यावर रूम हीटर वापरा. पण ते जास्त काळ चालू ठेवू नये. तसेच हीटर मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवा. यामुळे मुलांचे नुकसान होऊ शकते.

## तुमचे फेसबुक प्रोफाईल कोण पाहतंय गुपचूप गुपचूप ? ही ट्रीक वापरा, जाणून घ्या

**आज जवळपास प्रत्येकजण फेसबुक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सक्रिय आहे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सगळेच फेसबुक वापरतात. तुमच्या प्रोफाईलशी अनेक लोक जोडलेले असतील आणि त्यापैकी बरेच लोक तुमची प्रोफाईल तपासत असतील. तुमची फेसबुक प्रोफाइल कोण तपासत आहे हे तुम्हाला माहिती आहे का ? जर नसेल तर आज आम्ही तुम्हाला येथे पद्धत सांगत आहोत**




### कसे तपासायचे

तुम्हाला ब्राउझरची आवश्यकता असेल. तुम्हाला तुमच्या लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरमधील कोणत्याही ब्राउझरवर जावे लागेल. यानंतर तुम्हाला तुमच्या फेसबुक आयडीने लॉग इन करावे लागेल. यानंतर, जेव्हा तुमचे खाते उघडले जाईल, तेव्हा तुम्हाला तुमच्या प्रोफाइलवर राइट क्लिक करावे लागेल. नंतर तुम्हाला View page source वर क्लिक करावे लागेल. नंतर तुम्हाला CTRL+U दाबावे लागेल. यासाठी तुम्हाला CTRL + F वर क्लिक करावे लागेल. येथे तुम्हाला BUDDY_ID शोधायचा आहे. यानंतर तुम्हाला अनेक BUDDY_ID मिळतील. त्यात १५ अंकी कोड असेल. तुम्हाला याची कॉपी करावी लागेल. यानंतर तुम्हाला ब्राउझरच्या दुसऱ्या टॅबमध्ये facebook.com/profile आयडी पेस्ट करावा लागेल. असे केल्याने, ज्या व्यक्तीने तुमचा फेसबुक आयडी गुपचूप पाहिला आहे त्याचे प्रोफाइल उघडेल.

## लॅपटॉप कीबोर्ड स्वच्छ करण्याचे सोपे मार्ग

**लॅपटॉप कीबोर्ड स्वच्छ ठेवल्याने त्याचे आयुर्मान तर वाढतेच, पण आरोग्यासाठीही ते महत्त्वाचे आहे. कीबोर्डवर धूळ, घाण आणि बॅक्टेरिया जमा होतात. ज्यामुळे उपकरणाच्या कार्यक्षमतेवरच परिणाम होतोच, पण तुमचे आरोग्यही धोक्यात येऊ शकते. तुमचा लॅपटॉप कीबोर्ड स्वच्छ आणि परिपूर्ण ठेवण्यासाठी काही सोप्या टिप्स देत आहोत...**

- कीबोर्ड साफ करण्यापूर्वी वीज बंद करा : तुम्ही साफसफाई सुरू करण्यापूर्वी तुमचा लॅपटॉप बंद करा आणि शक्य असल्यास बॅटरी काढून टाका. हे शॉर्ट सर्किट किंवा डिव्हाइसचे नुकसान होण्याची शक्यता दूर करेल.
- हवेचा दाब (एअर ब्लोअर) वापरा : कीबोर्डमध्ये साचलेली धूळ आणि लहान कण काढून टाकण्यासाठी संगणक एअर ब्लोअर वापरा. ते काळजीपूर्वक वापरा जेणेकरून धूळ बाहेर येईल.



- मायक्रोफायबर कापड वापरा : कीबोर्ड पृष्ठभाग स्वच्छ करण्यासाठी मायक्रोफायबर कापड वापरा. कीबोर्ड किंचित ओलसर कापडाने पुसून टाका. कापड जास्त ओले होणार नाही याची काळजी घ्या, जेणेकरून यंत्राच्या आत पाणी जाणार नाही.
- स्वच्छतेसाठी आयसोप्रोपाइल अल्कोहोल वापरा : कीबोर्डचे डाग काढण्यासाठी आयसोप्रोपाइल अल्कोहोल (७०% किंवा जास्त) वापरा. कॉटन बॉल अल्कोहोलमध्ये भिजवून कीबोर्डची बटणे आणि कडा स्वच्छ करा.
- कीकॅप्स काढण्याचा पर्याय : तुमचा कीबोर्ड काढता येण्याजोग्या कीकॅप्ससह येत असल्यास, काळजीपूर्वक काढून टाका आणि स्वतंत्रपणे स्वच्छ करा. कीकॅप्स साबणाच्या पाण्यात धुवा, त्यांना वाळवा आणि पुन्हा बसवा.
- नियमितपणे स्वच्छ करा : धूळ आणि घाण साचू नये म्हणून दर आठवड्याला किंवा महिन्यातून एकदा तरी कीबोर्ड स्वच्छ करा.

जेवताना कीबोर्डपासून दूर राहा : खाताना किंवा पिताना कीबोर्ड वापरू नका. अन्नाचे कण आणि द्रव उपकरणाला हानी पोहोचवू शकतात.

- सिलिकॉन कव्हर वापरा : कीबोर्डवर सिलिकॉन कव्हर लावून घाण आणि धुळीपासून संरक्षण करता येते. ते स्वच्छ करणे देखील सोपे आहे.

## इन्व्हर्टरच्या बॅटरीत पाणी टाकायला विसरू नका, तुमचे कुटुंबच येईल धोक्यात!

**आजकाल बहुतेक लोक त्यांच्या घरात इन्व्हर्टर वापरतात. हिवाळ्यात तितकी गरज नसते, पण उन्हाळ्यात इन्व्हर्टरशिवाय दिवसच जात नाही. लोक इन्व्हर्टर खरेदी करतात, परंतु त्यांची योग्य देखभाल करत नाहीत. तसे न केल्यास कधी कधी अपघात होऊ शकतो. अनेक वेळा अशी प्रकरणे ऐकायला मिळतात ज्यात इन्व्हर्टरचा स्फोट होतो. आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टींची माहिती देत आहोत ज्यांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. असे न केल्यास, इन्व्हर्टरला आग लागू शकते आणि बॅटरीचा स्फोटदेखील होऊ शकतो. हे जीवघेणे देखील असू शकते**

- खराब वायरिंग : जेव्हाही तुम्ही घरात इन्व्हर्टर लावाल तेव्हा त्याच्या वायरिंगची विशेष काळजी घ्या. वायरिंग योग्य नसल्यास शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, योग्य वायरिंगची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे.
- वेळेवर पाणी न भरणे हे देखील कारण आहे : प्रत्येक इन्व्हर्टरच्या बॅटरीमधील पाण्याची पातळी तपासणे आवश्यक आहे. कारण आपण जितका इन्व्हर्टर वापरतो तितके पाणी कमी लागते. डिस्टिल्ड वॉटर त्याच्या बॅटरीमध्ये ओतले जाते. जर त्याची पातळी कमी झाली तर बॅटरी खराब होऊ शकते. केवळ नुकसानच नाही तर आग लागू शकते. अशा परिस्थितीत वेळोवेळी पाण्याची पातळी तपासली पाहिजे. पाणी कमी असल्यास ते वेळेवर भरावे.
- तापमान बरोबर ठेवणे महत्वाचे आहे : अनेक वेळा आपण इन्व्हर्टर अशा ठिकाणी ठेवतो जिथे हवा खेळती नसते. असे झाल्यावर, इन्व्हर्टर गरम होते आणि आग लागू शकते. अशा स्थितीत इन्व्हर्टर अशा ठिकाणी ठेवा जेथे हवा खेळती राहील.

## शॉर्ट न्यूज

### पाकिटमारी, मोबाइल चोरीच्या घटना वाढल्या

**कोपरगाव :** बसस्थानकात पाकिटमारी, पॉकेटमारी, मोबाइल व दागिने चोरीच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ होत आहे. पोलिस व आगार प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे. महिलांना अर्धे तिकीट, वृद्धांना मोफत प्रवास यामुळे सध्या बसला चांगलीच गर्दी आहे. याच गोष्टीचा फायदा चोरटे उठवित आहेत. चोरांमध्ये महिलांचाही सहभाग असल्याचे प्रवाशांकडून बोलले जाते. गेल्या आठवड्यात दोन महिलांचे दागिने बसमध्ये चढत असताना चोरट्यांनी लांबविले होते.

### सात हजार शेतकऱ्यांनी भरला बोगस पीक विमा

**श्रीरामपूर :** कांदा पिकाची लागवड केली नसताना बोगस पीक विमा घेण्यासाठी २०५५.९८ हेक्टर क्षेत्रावर अधिकची लागवड दाखवल्याचा प्रकार कृषी विभागाच्या तपासणीतून उघडकीस आला असून, यातून तब्बल १ कोटी २७ लाख रुपयांची बचत झाली आहे. सरकारकडून दोन वर्षांपासून एक रुपयात पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेत संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, श्रीगोंदा, कोपरगाव व पाथर्डी तालुक्यांतील ७ हजार २४१ शेतकऱ्यांनी तब्बल २०५५.९८ हेक्टर क्षेत्रावर कांद्याची लागवड नसताना विमा उतरवल्याचे समोर आले आहे.

### गटार काम बंद न केल्यास आंदोलन

**पाथर्डी :** सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत पाथर्डी नगरपरिषदेकडून बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या गटारीचे बांधकाम बंद करावे, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ग्राहक संरक्षण समितीचे तालुकाध्यक्ष अरविंद सोनटक्के यांनी सार्वजनिक बांधकाम खात्यासह जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा सोनटक्के यांनी दिला आहे. उपविभागीय अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### काष्टी येथे बिबट्याची सुटका

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टीजवळील तुळसाईनगर येथे एका विहिरीत मध्यम वयाचा बिबट्या पडला होता. वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली भगत यांनी दौंड येथील इको रेस्क्यू वन्यजीव बचाव पथकाला माहिती दिली. काही वेळातच सर्व वनकर्मचारी, रेस्क्यू पथकाचे प्राणी मित्र व स्थानिक प्राणी मित्र यांच्या संयुक्त प्रयत्नाने बिबट्याला यशस्वीरीत्या बाहेर काढले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली भगत यांच्याकडून स्थानिक लोकांना या प्राण्याविषयी माहिती देण्यात आली. तालुक्यात बिबट्याचा वावर आहे.

### नागेबाबा दिनदर्शिकेचे प्रकाशन

**नेवासा :** तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथे नागेबाबा २०२५ दिनदर्शिकेचे प्रकाशन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. नागेबाबा परिवाराचे अध्यक्ष कडुभाऊ काळे यांच्या संकल्पनेतून वडाळा येथे २०२५ च्या दिनदर्शिका प्रकाशन सोहळा राम महाराज बोचरे (खरवंडीकर), ग्रामविकास आधिकारी सतीश मोटे, माजी उपसरपंच सचिन मोटे याच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. नागेबाबा कोअर टिम मेंबर नितीन घोडके, स्वप्नील गाडेकर, शाखेतील कर्मचारी, शाखा आधिकारी जीवन आगळे, गोल्ड व्हॅलेवर विठ्ठल उदावंत आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य सैनिकाचा वारसा आहे, अजून लढणार आहे

## स्नेहसंवाद मेळाव्यात बाळासाहेब थोरातांचे भाषण

**संगमनेर : प्रतिनिधी**

**गोरगरिबांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी मागील ४० वर्ष अविश्रांत काम केले. त्यातून संगमनेर तालुका उभा राहिला. ही परंपरा आपल्याला यापुढेही जपायची आहे. तालुक्याचा विकास मोडण्यासाठी नवीन लोकप्रतिनिधीचा हत्यार म्हणून वापर होणार आहे. हिंदू मुस्लिम द्वेष पसरवून काहींनी राजकारण केले. मीही हिंदू आहे पण सर्व समाजाला सोबत घेऊन काम केले. संकटे आली तरी घाबरायचे नाही. स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा आहे. जनता आपल्या सोबत असल्याने आपण लढणार आहोत, असे काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.**



यशोधन संपर्क कार्यालयाजवळील मैदानावर झालेल्या स्नेहसंवाद मेळाव्यात बाळासाहेब थोरात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा आ.डॉ. सुधीर तांबे, नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, बाजीराव पाटील खेमनर, माधवराव कानवडे, हिरालाल पगडाल, वसीम भाई आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. आमदार थोरात म्हणाले की, तालुक्यातील जनतेने आपल्यावर भरभरून प्रेम केले. ४० वर्ष या विभागाचे नेतृत्व करताना अविश्रांत काम केले. मोठ्या कष्टातून तालुका उभा केला. दुष्काळी तालुका ते प्रगतशील तालुका असा लौकिक देशात पोहोचविला. सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श पॅटर्न निर्माण केला. तालुक्यातील गोरगरिबांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी राजकारण केले. कधीही कोणाला त्रास दिला नाही. कधी चुकीचा शब्द बोललो नाही. कुणाचे मन दुखवले नाही.

**निळवंडे धरणाच्या कामाला गती दिली**

१९८५ मध्ये पाण्यासाठी मोठा संघर्ष केला त्यातून ३० टक्के हक्काचे पाणी तालुक्याला मिळाले. ९९ मध्ये राज्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर निळवंडे धरणाच्या कामाला गती दिली. एकही दिवस वाया न घालवता आदर्श पुनर्वसन करून धरण व कालवे पूर्ण केले. ज्यांनी या कामांमध्ये कोणतेही योगदान दिले नाही ते आता श्रेय घेण्यासाठी पुढे येत आहे. परंतु काम कोणी केले. हे जनतेला माहित आहे. अजूनही ज्या लोकांना पाणी मिळाले नाही त्यांना पाणी देण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे.

**आपल्यातील मतभेद मिटवा संघटित होऊन लढायचे**

निवडणूक संपली की राजकारण संपले अशी आपली पद्धत आहे. हीच परंपरा आपल्याला जपायची आहे. काही लोकांना तालुक्याचा विकास मोडायचा असून नवीन लोकप्रतिनिधीचा ते हत्यार म्हणून वापर करतील. तालुक्याचे पाणी पळवतील. विकास मोडीत काढतील हे आपल्याला होऊ द्यायचे नाही. आपल्यातील मतभेद मिटवा संघटित होऊन लढायचे आहे. मी स्वातंत्र्यसैनिक भाऊसाहेब थोरात यांचा मुलगा आहे. संघर्ष आपल्याला नवीन नाही. जनता आपल्याबरोबर असल्याने आपल्याला लढायचे आहे. आपला सहकार चांगला आहे. बाजारपेठ चांगली आहे. शेती समृद्ध झाली आहे. बायपास, हॅपी हायवे, सह बसस्थानक, शहरातील भव्यदिव्य इमारती आणि निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन, असे अनेक मोठमोठे प्रकल्प आपण राबवले आहे. काम केले त्याबद्दलची कृतज्ञता सर्वांनी ठेवली पाहिजे.

**विरोधकांनी खोटे व्हिडिओ टाकून बदनामी करण्याचे षडयंत्र रचले**

१९८५ पूर्वी संगमनेर हे दंगलीचे शहर म्हणून ओळखले जायचे. परंतु ४० वर्ष सर्व समाजामध्ये आपण बंधुभाव निर्माण केला. एक आदर्श वातावरण तयार केले. मीही हिंदू आहे. परंतु इतरांचा कधीही द्वेष केला नाही. मानवता हा धर्म पाळून काम करत आहोत. मी वारकरी संप्रदायाचा पाईक आहे. अनेक तीर्थस्थळ उभे केली आहेत. परंतु विरोधकांनी काही खोट्या एजन्सी तयार करून खोटे व्हिडिओ टाकून बदनामी करण्याचे षडयंत्र रचले आहे. सत्तेचा गैरवापर करून तालुक्यातील आपल्या अनेक कार्यकर्त्यांवर त्यांनी खोट्या केसेस टाकल्या. अनेकांच्या प्रपंचात माती कालवली. हे सर्व थांबवण्यासाठी आपण शिर्डी मतदार संघात जाऊन लढा दिला. यापुढेही आपल्या सगळ्यांना एकजूट होऊन लढायचे आहे असे ते म्हणाले.

**संगमनेरचा लौकिक राज्यभर वाढवला**

तर आमदार डॉ. तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अत्यंत सेवाभावीपणे काम करून तालुका उभा केला. भंडारदरा धरणाचे हक्काचे पाणी मिळवले. निळवंडे धरण व कालवे निर्माण केले. देशासाठी आदर्शवत सहकार निर्माण केला. गावागावात विकासाची कामे केली. मंत्रीपदाच्या माध्यमातून संगमनेरचा लौकिक राज्यभर वाढवला. लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे व्यक्तिमत्व आणि काम आपल्या पाठीशी आहे. खोटे नाटे व्हिडिओ पसरून घाणेरडे राजकारण केले जात आहे. परंतु आपण लढणारी माणसं आहोत. थोरात यांनी कायम आदर्श मूल्य जपली. राजकारणातील पावित्र्य जपले. लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे कार्यकर्ते दुःखी झाले असतील मात्र निराश होणार नाही येणाऱ्या काळामध्ये या संकटावर मात करून पुन्हा राज्याचे नेतृत्व संगमनेर तालुक्याकडे येईल यासाठी काम करा असे आवाहन त्यांनी केले.

**विविध मंत्री पदाच्या माध्यमातून ऐतिहासिक काम**

१९९९ ला राज्य मंत्रिपदाची शपथ घेतली आणि निळवंडे धरण हाती घेतले. कृषी मंत्री पदाच्या काळामध्ये विद्यापीठांना संशोधनाला चालना देऊन राज्यात सर्वाधिक कृषी उत्पादन केले. जलसंधारण मंत्री असताना एक लाख शेततळी निर्माण केली. तर शिक्षण मंत्री असताना बेस्ट ऑफ फाईव्हचा ऐतिहासिक निर्णय घेतला. महसूल मंत्रीपदाच्या काळामध्ये विविध देवस्थानच्या जमिनी, खंडकरी शेतकरी प्रश्न , नझुल जमीन असे अनेक प्रश्न सोडवताना या खात्याला लोकाभिमुख केले. प्रदेशाध्यक्ष, गटनेता, सतरा वर्ष मंत्री चाळीस वर्षे आमदार याचबरोबर राष्ट्रीय पातळीवर काम करताना गुजरात आणि हिमाचल प्रदेशची यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली आणि आता काँग्रेसच्या महत्त्वपूर्ण २१ लोकांच्या कमिटी मध्ये समावेश हा संगमनेर तालुक्यातील जनतेचा सन्मान आहे. निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले आता हे पाणी कालव्याच्या वरच्या भागात देण्यासाठी सुद्धा आपण काम करणार असून झालेल्या चुकांची दुरुस्ती केली जाईल असे, थोरात म्हणाले

**हा पराभव नाही तर घात -डॉ तांबे**

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी राजकारणातील पावित्र्य जपले. कधीही तत्त्वांची तडजोड केली नाही मात्र जातीय तणाव निर्माण करून द्वेष भावना पसरून घाणेरडे राजकारण करणाऱ्या मंडळींनी संस्कृत नेतृत्वाचा पराभव नव्हे तर घात केला असल्याची टीका माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांनी केली आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# माझ्या आईचे पुण्यस्मरण

माता : संस्कृतीची पाठशाळा मथळ्याचा एक लेख मी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांत लिहिला आहे. आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर. या दोन्हींचे मीलनरूप म्हणजे आई. अशी आई या शब्दाची निरुक्ती मी कीर्तनात ऐकली होती. तरीही आई या शब्दाचे माहात्म्य कवेत येत नाही. आकाशासमान उंच आणि समुद्रासारखे खोल असे तिचे महिमान आहे. या विश्वात जो जो जीव जन्माला आला त्या प्रत्येकाला आई असते. जननी, धात्री, माता अशी तिला समानार्थी नावे आहेत. ज्यांना आईचा सहवास किंवा माया मिळाली नाही तेच आईचे खरे महत्त्व जाणतात. माझी आई मध्यम उंचीची, नऊ वारी काष्टी साडी नेसायची. वर्ण गोरा होता. कपाळावर भल्या मोठ्या कुंकवाचे वर्तुळ तिला शोभून दिसे. डोईचा पदर कधी खांद्यावर आला नाही. तिच्या पूर्वपिढीने तिच्यावर केलेले ते संस्कार होते. ती निरक्षर होती. चार आण्याची चार नाणी मिळून एक रुपया होतो. एवढेच तिचे व्यवहारी ज्ञान होते. आमच्या एकत्र कुटुंबात व्यवहार बघण्याची तिला गरजच नव्हती. शेतात राब राब राबणे. प्रसंगी मोलमजुरी करणे हेच तिला ठाऊक होते. आमच्या मळ्यातील इतर मुले तिला मोठ्याई म्हणत. मनाने ती सुसंस्कृत होती. तोंडात अर्वाच्य किंवा अभद्र शब्द नसत. ते तिला जीवनभर कसे साधले ते मला कळले नाही! स्वभावाने एकदम विनोदी होती. कविप्रकृतीची असल्याने तिचे बोलणे टपक्यावर असे. घबाड घावलं



आन त्वांड शिवलं. तळ्यात का मळ्यात नको. गोतावळ्यात बरं. ही तिची बोलण्याची ढब असे. खंडोबा, म्हसोबा, अंबा, यमाई, मळाई अशा गैरब्राह्मणी दैवतांवर तिची भक्ती होती. ब्राह्मणी गैरब्रह्मणी हे शब्द तिच्या नव्हे; तर माझ्या शब्दकोशातले! तशी ती कविमनाची होती. पहाटे उठून जात्यावर दळण दळता दळता ओव्या रचायची आणि गायची. तिच्या आवाजात गोडवा होता. तिच्या कवित्वाचे गुण माझ्यात उतरले. माझा स्वभाव मवाळ असला तरी प्रसंगी कठोर शब्दही मी वापरतो. मी कविप्रकृतीचा आणि चार बुके शिकलो असल्याने नवरसांचा भोक्ता आहे. आमच्या एकत्र परिवारातील जमीनजायदादीचा न्यालयीन कज्जाकलह मिटता मिटेना. शेवटी तिनेच आपले डोळे मिटून घेतले ते कायमचेच! ‘‘आहेव (सुवासिनीचं) मरण चांगलं!‘‘असे ती सांगत असे. ते तिने खरे करून दाखविले.

होईल होईल वाटत होते तेच अखेरीस झाले
नाव घेतल्यावाचुन आता मनात झुरणे आले

असे कवी गोविंदाग्रजांच्या एका कवितेचेच नव्हे; तर आईचेही दोन चरण आठवले!

प्राण्यांची शाळा नामक माझा बालकविता संग्रह २००७ साली ठाणे येथे कवी नारायण सुर्वे यांच्या हस्ते प्रकाशित झाला. तो माझ्या आईलाच अर्पण केलेला आहे. तिचे पुण्यस्मरण म्हणून!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

(पान १ वरुन)

### देवेंद्र फडणवीस पुन्हा येणार!

असे म्हटले. यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांनी नव्या सरकारची नवी लाईनही मांडली.

आपण एकमताने गटनेता म्हणून माझी निवड केली. त्याबद्दल आभार. या निवड प्रक्रियेसाठी आलेले रुपानी आणि सीतारामण यांचं मनापासून आभार मानतो. यावेळची निवडणूक ही अतिशय ऐतिहासिक होती. या निवडणुकीचं विश्लेषण करायचं झालं तर मी म्हणेल या निवडणुकीने एक गोष्ट ठेवली आहे, ती म्हणजे एक है तो सेफ है आणि मोदी है तो मुमकीन है. मोदींच्या नेतृत्वात देशात विजयाची मालिका लोकसभेनंतर हरियाणापासून सुरू झाली. महाराष्ट्राने जो कौल दिला आहे. खरं म्हणजे राज्यातील जनतेला मी साष्टांग दंडवत घालतो,असा कौल दिला आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**अमृतमहोत्सवी वर्षात आपलं सरकार स्थापन करतोय : फडणवीस**

विशेषत: या संपूर्ण प्रक्रियेत आपल्यासोबत पूर्णपणे तनमनाने आपल्यासोबत असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही मनापासून आभार मानतो. आरपीआयचे नेते रामदास आठवले आणि सर्व मित्र पक्षांचे मनापासून आभार मानतो. हे महत्त्वाचं वर्ष आहे. एकीकडे आपण ज्या प्रक्रियेतून निवडून येतो, ती प्रक्रिया संविधानाने दिली. बाबासाहेबांनी तयार केलेल्या संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होत आहे. हे महत्त्वाचं वर्ष आहे. देशाचे पंतप्रधान मोदी हे नेहमी सांगतात कोणत्याही धर्मग्रंथासाठी माझ्यासाठी संविधान सर्वात महत्त्वाचं आहे. एक असं संविधान त्याने प्रत्येक भारतीयांना मोठं होण्याचा अधिकार दिला. देशाला एक उत्तम राष्ट्र म्हणून प्रस्थापित करण्याचं काम केलं आहे. या अमृतमहोत्सवी वर्षात आपलं सरकार स्थापन करत आहोत, असे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

हिंदुस्थानात मोगली आक्रमणानंतर आपल्या श्रद्धास्थानाचं पुनरुत्थान केलं त्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती आहे. बिरसा मुंडा यांचीही १२५ जयंतीचं वर्ष आहे. वाजपेयी यांचं देखील हे १०० वं जयंती वर्ष आहे. या महत्त्वाच्या जयंती वर्षात जनतेने महायुतीवर जबाबदारी दिली आहे. इतका मोठा जनादेश आपल्याला जनतेने दिला आहे. या जनादेशातून एवढंच म्हणेल आनंद आहे, असेही ते म्हणाले.

# पद्मश्री पवारांना शपथविधी सोहळयाचे निमंत्रण

## राज्य सरकारचा सांगावा

**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारच्या शपथविधी सोहळयासाठी गुरूवार दि.५ डिसेंबरचा मुहूर्त मुक्रर करण्यात आला असून या सोहळयास उपस्थित राहण्याचे निमंत्रण राज्य शासनाच्या वतीने आदर्श गाव संकल्प व समितीचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांना देण्यात आले आहे.**



गुरूवारी मुंबईतील आझाद मैदानावर महायुती सरकारच्या मंत्रीमंडळाचा शपथविधी होणार आहे. या सोहळयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशाचे गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील व्यक्तिंनाही या सोहळयासाठी निमंत्रीत करण्यात आले आहे. पोपटराव पवार यांना शपथविधी सोहळयासाठी निमंत्रीत करण्यात आले असून ते गुरूवारी या सोहळयास उपस्थित राहणार असल्याचे हिवरे बाजार ग्रामस्थांच्या वतीने सांगण्यात आले.

दि.२२ जानेवारी २०२४ रोजी आयोध्या येथे श्रीराम मुतच्या प्राण प्रतिष्ठा सोहळयासाठीही पद्मश्री पोपटराव पवार यांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. या निमंत्रणाचा स्विकार करून पवारांनी या सोहळयास उपस्थिती लावली होती. त्या प्रित्यर्थ श्रीरामांची मुर्ती घडवितानाच्या शिलांशाचे काही भाग निवडक ३०० पाहुण्यांना पाठविण्यात आले होते. त्यात हिवरेबाजारलाही एक शिलांशाचा अंश मिळाला होता. त्याचा उत्सव हिवरे बाजार ग्रामस्थांनी १६ ते २३ एप्रिल दरम्यान श्रीराम कथा उत्सव साजरा करून साजरा केला होता.

# १६ लाखाचा बनावट खतांचा साठा जप्त

## कृषी सेवा केंद्रावर कारवाई

**नेवासा : प्रतिनिधी**

**नेवासा तालुक्यातील जय किसान फर्टिलायझर अँड केमिकल्स या दुकानावर कृषी विभागाने बनावट खत निर्मितीसाठ्यावर छापा टाकून १६ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दुकान कृषी विभागाने सील केले आहे.**

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांना मिळालेल्या माहितीनुसार नेवासा तालुक्यातील जय किसान फर्टिलायझर अँड केमिकल्स या दुकानात बनावट खत निर्मिती होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.




त्यानुसार तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, कृषी अधिकारी प्रताप कोपनर, बाळासाहेब कासार, रखमाजी लांडे, राहुल ठोंबरे, प्रवीण देशमुख, कृषी सहाय्यक दिलीप घोंळवे यांच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली. सदर छाप्यात खत निर्मिती साठी लागणारे आवश्यक रसायने, खत, रिकाम्या खतांच्या बॅग, बॅग सिलिंग मशीन, व इतर साहित्य जप्त करण्यात आले. सदर कृषी केंद्राकडे घाऊक खत विक्रीचा कुठलाही परवाना तसेच उत्पादनाचा परवाना नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे कृषी विभागाने सदर दुकान सील केले आहे.

**पारनेर नगरपंचायत पारनेर**
जा.क्र.पानपं.बांध जाहीर आवाहन/१८२३/२०२४
पारनेर नगर पंचायत पारनेर दि. ०४/१२/२०२४

**जाहीर आवाहन**

पारनेर नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरीकांना जाहीर आवाहन करणेत येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१५५/२०११ मधीन दिलेल्या निर्देशानुसार पारनेर नगरपंचायत हद्दीतील अनधिकृत होर्डिंग/बॅनर बाबतच्या तक्रारी https://mahaulb.in या संकेतस्थळावरुन नगरपरिषद प्रशासन संचालयनालय, नवी मुंबई यांचेमार्फत विकसित करणेत आलेल्या Integrated Web Based Portal (IWBP) प्रणालीवरील तक्रार मोड्युलचा वापर करुन तसेच coparner@gmail.com या इमेलवर अथवा ०२४८८-२२१५५८ या दूरध्वनी क्रमांकावर पारनेर नगरपंचायत कार्यालय येथे तक्रार दाखल करता येईल.

(शिक्का)

सही
(विनय शिपाई)
मुख्याधिकारी
पारनेर नगरपंचायत, पारनेर

# ट्रेलर उलटल्याने पाच तास वाहतूकीची कोंडी

## नगर-पुणे महामार्गावर अपघात | एअरबॅगमुळे कारमधील दोघे बचावले




नगर-पुणे महामार्गावरील पवारवाडी येथे ट्रेलर उलटून झालेल्या अपघातानंतर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागून वाहतूकीची कोंडी निर्माण झाली होती.

सुपा : प्रतिनिधी

**नगर-पुणे महामार्गावर नगरकडून पुण्याच्या दिशेने भरधाव वेगाने जाणारा ट्रेलर चालकाचे नियंत्रण सुटल्याने उलटून झालेल्या अपघातात ट्रेलरमधील दोघे गंभीर जखमी झाले. अपघातग्रस्त ट्रेलरवरील कंटेनर रस्त्याच्या विरूध्द दिशेला जाऊन पडल्याने त्या रस्त्याने जाणारी हायरायडर कार त्यास धडकली मात्र एअरबॅगमुळे कारमधील दोघे बालंबाल बचावले. दरम्यान, अपघातग्रस्त वाहने रस्त्यावर आडवी झाल्याने महामार्गावरील वाहतूक तब्बल पाच तास ठप्प झाली होती.**

नगर व पुण्याकडे जाणारी वाहतूक या अपघातामुळे तब्बल पाच तास खेळंबली. नगरच्या दिशेने सहा तर पुण्याच्या दिशेने चार किलोमिटरपर्यत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूक कोंडीत सापडलेल्या वाहनालकांना तसेच प्रवाशांना त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागला. रूग्णवाहिका तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तिही त्यातून सुटू शकल्या नाहीत.

सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. सुप्याच्या पवारवाडीजवळील तीव्र वळणावर ट्रेलर चालकाचा ताबा सुटून हा अपघात झाला. मिळालेल्या माहीतीनुसार ट्रेलर चालकाने उतारावर इंधन वाचविण्यासाठी ट्रेलर न्युट्रल अवस्थेत ठेवला होता. त्यामुळे उतार व तीव्र वळणाचा अंदाज न आल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले. ट्रेलरवरील कंटेनर नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर कोसळला त्यावेळी त्या रस्त्याने एक क्रेटा कार जात होती. मात्र या अपघातामधून ही कार बचावली. हाय रायडर कार मात्र या अपघातातून वाचू शकली नाही.

अपघाताची माहीती समजल्यानंतर सुपे पोलीस ठाण्याचे कर्मचारी विजय वेठेकर, अमोल धामणे यांनी अपघात स्थळी धाव घेत मदत कार्य सुरू केले. मात्र अपघातानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहतूकीची मोठी कोंडी झाल्याने मदत कार्यात अडथळे येत होते. अपघातग्रस्त ट्रेलर व कंटेनर रस्त्यावर आडवे झाल्याने ते दुर करण्यासाठी मागविण्यात आलेले क्रेन अपघातस्थळापर्यंत येईपर्यंत बराच कालावधी उलटून गेला. अपघातस्थळी क्रेन येउन ट्रेलर व कंटेनर दुर करेपर्यंत पहाटेचे एक वाजले. त्यानंतर पहाटे दिड वाजण्याच्या सुमारास काही प्रमाणात वाहतूक सुरळीत झाली.

### पवारवाडीकरांचे मदतकार्य

पवारवाडी येथील महेश पवार, संग्राम पवार, राहुल पवार, जय पठारे, नितिन पवार, संदीप पवार, अभिषेक पवार, विजय पवार, महेश गवळी, भुषण पवार,यांच्यासह तरूणांनी एकत्र येत वाहतूकीची कोंडी दुर करण्यासाठी प्रयत्न केले. रूग्णवाहिकांना वाट करून देतानाचा जखमींना रूग्णालयात पोहचविण्यासाठी पुढाकार घेतला.

### वळण हटविण्याची गरज

सुप्याच्या पवारवाडी येथील तिव्र उतारावरून नगरकडून पुण्याकडे जाणाऱ्याअवजड वाहनांवरील चालकांचे नियंत्रण सुटून अतापर्यंत अनेक अपघात होउन निष्पाप प्रवाशांचे बळी गेले आहेत. अपघात टाळण्यासाठी या रस्त्यावरील वळण हटवून रस्ता सरळ करणे गरजेचे आहे. अपघातानंतर वाहतूकीची होणारी कोंडी ही नित्याची असून ती दुर करण्यासाठी पोलीसांकडून फारसे प्रयत्न होत नाहीत. स्थानिक नागरीकांना वाहतूक सुरळीत करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो.

**राहुल पवार**
ग्रामस्थ, पवारवाडी सुपा

# दिव्यांगांचे प्रश्न मार्गी लावणार - डॉ. प्रदीप दाते

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर-नगर मतदार संघातील दिव्यांग बांधवांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ. काशिनाथ दाते हे तत्पर असून दिव्यांग बांधवांनी त्यांचे प्रश्न आमच्याकडे द्यावेत ते दुर करण्याची जबाबदारी आमची राहिल असे प्रतिपादन डॉ. प्रदीप दाते यांनी केले.**

दि.३ डिसेंबर हा दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून दिव्यांग बांधवांचा दाते परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात आला.

आ. काशिनाथ दाते यांच्या निवासस्थान जागतिक दिव्यांग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माळकुप येथील अरूण गवळी, शारदा गवळी, निर्मला भालेकर, शिवशंकर शिंदे, विष्णू शिंदे, भाळवणी येथील अरूण रोहोकले, दीपक रोहोकले, आदी उपसिथत होते. यावेळी आ. काशिनाथ दाते यांच्या वतीने दिव्यांग बांधवांना दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप दाते यांनी सांगितले की, दाते परिवार दिव्यांग बांधवांच्या न्यायय हक्कांसाठी, त्यांच्या समस्या दुर करण्यासाठी सदैव कटीबध्द राहील. आ. काशिनाथ दाते हे सर्व प्रश्न माग लावण्याची भूमिका पार पाडतील असा विश्वास डॉ. दाते यांनी व्यक्त केला. यावेळी मंगेश दाते व दाते परिवारातील सदस्य उपस्थित होते.

### जागतिक दिव्यांग दिन

संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने १९८३ व १९९२ हे दशक दिव्यांगांसाठी अर्पण करण्यात आले होते. या दशकामध्ये दिव्यांगांच्या उध्दारासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. या दशकाच्या अखेरीस दि.३ डिसेंबर या दिवसाची जागतिक अपंग दिन साजरा करण्यासाठी निवड करण्यात आली. सन २०१६ मध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियमानुसार अपंग या शब्दाऐवजी दिव्यांग असा शब्द वापरण्यात येऊ लागला.

# स्वराली आंग्रे वक्तृत्त्व स्पर्धेत प्रथम

केडगाव : प्रतिनिधी



**येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांबळे वस्ती(केडगाव)ची इयत्ता पहिलीची विद्यार्थीनी कु. स्वराली आनंद आंग्रे हिने नुकत्याच पार पडलेल्या वकृत्व स्पर्धेत केंद्रात प्रथम क्रमांक पटकाविला.या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.तिला आई-वडील, मुख्याध्यापिका श्रीमती सालके, वर्गशिक्षिका श्रीमती हंडाळ यांचे मार्गदर्शन लाभले.**

# एमआयडीसीतील रस्ता तीन महिन्यात उखडला!

## दोषींवर कारवाईची मनसेची मागणी | मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा



सुपा : प्रतिनिधी

**सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमधील अंतर्गत रस्त्यांचे तीन महिन्यांपुर्वी करण्यात आलेले डांबरीकरण उखडले असून याप्रकरणी दोषी असलेला ठेकेदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी अविनाश पवार यांनी केली आहे.**

यासंदर्भात पवार यांनी औद्योगिक विकास महामंडळाकडे दिलेल्या तक्रारीत नमुद करण्यात आले आहे की, जुन्या एमआयडीसीमधील अंतर्गत रत्यांच्या डांबरीकरणाचे काम अद्यापही सुरू आहे. तीन महिन्यांपूव सुरू करण्यात आलेल्या बहुतांश रस्त्यांचे काम निकृष्ट पध्दतीने झाले असून अनेक ठिकाणी हा रस्ता उखडला जाऊन खड्डे पडलेले आहेत. औद्योगिक वसाहतीमध्ये अवजड वाहनांची नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून दुरावस्था झालेल्या या रस्त्याचे काम करण्याची मागणी करण्यात आल्यानंतर दर्जाहिन काम करण्यात येत असल्याने रस्त्याची अवस्था जैसे थे आहे. अवजड वाहतूकीचा विचार करून काम होणे गरजेचे असल्याचे अविनाश पवार यांचे म्हणणे आहे.

या रस्त्याच्या दर्जाविषयी औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने लेखी स्वरूपात खुलासा द्यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा मनसेच्या माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### काळ्या यादीत टाकून ठेकेदाराचे बील रोखा

शासनाने या कामासाठी कोटयावधी रूपयांचा निधी मंजुर केलेला असताना या कामांची देखरेख करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी ठेकेदाराला पाठीशी घालत असल्याने त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी. संबंधित ठेकेदाराचे बिल रोखण्यात येऊन त्याला काळ्या यादीत कायमस्वरूपी टाकण्यात यावे अशी मागणीही अविनाश पवार यांनी केली आहे.

### कामाचे ऑडीट करा

या रस्त्यांचे काम करताना अंदाजपत्रका प्रमाणे काम करण्यात आले नसून या रस्त्यांचा दर्जा तपासण्यासाठी त्याचे ऑडीट होणे गरजेचे आहे. पुढे काम सुरू असताना पाठीमागचा रस्ता पुन्हा खड्डेमय होउन जैसे थे झाला आहे. अनेक ठिकाणी डांबरचा एकच रफ हात मारण्यात आला असून कुठे चढ तर कुठे उतार अशी या रस्त्याची अवस्था झाली आहे. नव्याने रस्ता करण्याच्या नावाखाली केवळ मलमपट्टी करण्यात आली असून संबंधित अधिकारी हे सर्व उघडया डोळयांनी पाहत आहेत.

**अविनाश पवार**
राज्य उपाध्यक्ष मनसे माथाडी कामगार सेना

# वन व जलसंधारणाची कामे करणाऱ्या गावांना पाठबळ देणार - आमदार काशिनाथ दाते

हिवरे बाजार : प्रतिनिधी



**निसर्ग संवर्धन करणाऱ्या गावांसाठी राळेगणसिद्धी व हिवरेबाजार हे प्रेरणास्त्रोत असून मतदार संघातील जल व वनसंवर्धनाची कामे करणाऱ्या गावांना सर्वतोपरी पाठबळ देणार असल्याची ग्वाही आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.**

नवनिर्वाचित आमदार श्री. दाते यांनी मतदारांचे आभार मानण्यासाठी आदर्श गाव हिवरे बाजार येथे भेट दिली. यावेळी आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांनी दाते यांचे स्वागत व सत्कार केला यावेळी ते बोलत होते.

आमदार दाते पुढे म्हणाले की, तापमान बदलाचे दुष्परिणाम जगभर होत आहेत त्यामुळे वृक्षारोपण व जलसंधारणाची आणखी कामे होण्याची गरज आहे ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली राळेगणसिद्धी व पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरे बाजार या गावांबरोबरच तालुक्यातील भाळवणी , पिंपरी जलसेन , पिंपरी गवळी या गावांनी देखील ग्रामविकासात चांगले काम केल्याचे आ.दाते यांनी सांगितले.

श्री.हजारे व पवार यांचे मार्गदर्शन घेऊन पर्यावरण ,पाणलोट, स्वच्छता, व्यसनमुक्ती व आदर्श गावांच्या सप्तसूत्रीचे पालन करणाऱ्या मतदारसंघातील गावांना विकास योजना राबविण्याबाबत प्राधान्य देणार असल्याचे आमदार दाते यांनी सांगितले. हिवरे बाजार ग्रामस्थांनी स्वागत प्रसंगी कोणताही डामडौल न करता प्रवेशद्धाराजवळ नवनिर्वाचित आमदार श्री. दाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पद्मश्री पवार यांनी यावेळी आ.दाते यांचा सत्कार केला. याप्रसंगी मा.जि.प. सदस्य वसंतराव चेडे, सरपंच विमलताई ठाणगे, सेवा संस्थेचे अध्यक्ष छबुराव ठाणगे,उपाध्यक्ष जालिंदर चत्तर , मीनाताई गुंजाळ ग्रा. पं. सदस्य रो.ना. पादीर , अर्जुन पवार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### मानवी मूल्यांची जोपासना महत्वाची

राजकारणापेक्षा समाजकारण करण्यावर आपला अधिक भर आहे. राजकारणापेक्षा मानवी मूल्यांची जोपासना करणे महत्त्वाचे आहे.

**काशिनाथ दाते**
नवनिर्वाचित आमदार

# डॉ. आंबेडकर स्मारकाची दुरूस्ती करा

## आरपीआय आंबेडकर गटाने वेधले लक्ष

पारनेर : प्रतिनिधी



**येत्या ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन असून त्या पार्श्वभुमीवर नगर पंचायत प्रशासनाने पारनेर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची डागडुजी, दुरूस्ती तसेच परीसराची साफ सफाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले गटाच्या वतीने निवेदनादवारे करण्यात आली. आठवले गटाचे शहराध्यक्ष प्रदिप नगरे व संगम सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने हे निवेदन प्रशासनाकडे सुपूर्द केले.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी तालुक्यातील तमाम भिमसैनिक पारनेर शहरातील डॉ. आंबेडकर यांच्या स्मारकामध्ये अभिवादन करण्यासाठी हजेरी लावत असतात, याकडे या निवेदनाद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे. दि.६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी स्मारकाची दुरूस्ती, डागडुजी त्वरीत करण्यात यावी, परिसर स्वच्छ करण्यात यावा. स्मारकाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला असून तो सुरळीत करण्यात यावा, स्मारकाच्या मिटरमधून परिसरातील काही व्यवसायिक अनधिकृतपणे वीजेची जोडणी घेतात. त्यांना नगरपंचायत प्रशासनाने समज देऊन कारवाई करण्यात यावी अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. दोन दिवसांत मागण्यांची दखल न घेतली गेल्यास तिव्र आंदोलन छेडण्याच्या पावित्रयात तमाम भिमसैनिक असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

निवेदनावर संगम सोनवणे, अक्षय बोरूडे, सुधीर सोनवणे, अजय सोनवणे, प्रदिप नगरे, स्वप्निल कांबळे, जिवन घंगाळे, सुधिर नगरे, सनी साळवे, राहुल आडागळे, राकेश आल्हाट, महेश उमाप आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिरापुरचा सोन्या पंजाबात शड्डू ठोकणार!

## देशपातळीवरील आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी निवड

शिरापुर : प्रतिनिधी



**बुध्दीवाद्यांचा तालुका अशी ओळख असलेल्या पारनेर तालुक्यातील तरूणांनी कुस्तीक्षेत्रातही चमकदार कामगिरी करत तालुक्याच्या शिरपेचात अनेकदा मानाचे तुरे रोवलेले असतानाच आता शिरापुर येथील ऋषिकेश तथा सोन्या एकनाथ उचाळे हा भटिंडा, पंजाब येथे पार पडणाऱ्या देशपातळीवरील आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत शडडू ठोकत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहे.**

फ्री स्टाईल कुस्तीमधील ६५ किलो वजनगटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत नाशिक येथे पार पडलेल्या आंतर विभागीय स्पर्धेत ऋषिकेश याने नेत्रदिपक कामगिरी करीत पहिला क्रमांक पटकावत तो राष्ट्रीय पातळीवरील कुस्ती स्पर्धे साठी पात्र ठरला होता. आता दि.४ ते २५ जानेवारी दरम्यान पंजाबमधील भटींडा येथे पार पडणाऱ्या आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ६५ किलो वजन गटामध्ये त्याची निवड झाली आहे.

### ऋषिकेश पारनेरचे नाव उज्वल करेल

पारनेर तालुक्यात अनेक गुणी कुस्तीपटू आहेत. त्यापैकी एक असलेल्या ऋषिकेश उचाळे याने विभागीय पातळीवर प्रथम क्रमांक पटकावून तो आता देशपातळीवरील स्पर्धा गाजवायला निघाला आहे. त्याची आजवरची कामगिरी पाहता तो राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत पारनेर तालुक्याचे नाव निश्चित उज्वल करेल. त्याला या स्पर्धेसाठी नगर लोकसभा मतदार संघातील तमाम जनतेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा !

**खा. नीलेश लंके**, लोकसभा सदस्य

### विविध स्पर्धांवर छाप !

ऋषिकेश हा कला शाखेचा विद्याथ असून तो कला शाखेचे पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. शिक्षणाबरोबरच त्याने आतापर्यंत विविध कुस्ती स्पर्धांमध्ये आपले कौशल्य पणाला लावत अनेक कुस्ती स्पर्धांवर आपली छाप सोडलेली आहे.

### पारनेर महाविद्यालयाचा विद्यार्थी

राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचे नेतृत्व करणारा ऋषिकेश हा पारनेर महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, क्रीडा संचालक डॉ. संजय गायकवाड, सावकार काकडे, गंगाराम खोडदे यांनी त्याचे अभिनंदन करीत पंजाबातील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com